आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१ एप्रिल २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या सर्व नागरिकांना सोयीनुसार बँकिंग करता यावं यासाठी धोरण निश्चित करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त

- जुलैपर्यंत काँग्रेसकडून आयकर थकबाकी वसूल करणार नसल्याचं केंद्र सरकारचं सर्वोच्च न्यायालयात निवेदन

- महावितरणच्या ग्राहकांसाठीचे नवे वीज दर आजपासून लागू

- खराब हवामान, पावसामुळं ईशान्य भारतात अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत, पश्चिम बंगालमधल्या जलपाईगुडी जिल्ह्यात चौघांचा मृत्यू

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना

**<><><><><>**

देशातल्या सर्व क्षेत्रातल्या नागरिकांना, व्यावसायिकांना सोयीनुसार आणि गरजेनुसार बँकिंग करता यावं तसंच बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. रिझर्व बँकेच्या स्थापना दिनाच्या निमित्तानं मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डिजिटल व्यवहारांना प्राधान्य देताना रोखे विरहित व्यवहारांमधून होणाऱ्या बदलांकडे लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड प्रधानमंत्री**

सर्वसमावेशक प्रगतीसाठी विभिन्न क्षेत्रांची भविष्याची गरज ओळखून काम करण्याची आणि अभिनव संकल्पना राबवण्याची शिफारस प्रधानमंत्र्यांनी रिझर्व्ह बँकेला केली. गेल्या १० वर्षात देशातल्या बँकिंग व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आढावा त्यांनी भाषणात घेतला. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं लोकार्पण झालं.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कोरोना काळात रिझर्व्ह बँकेनं उचललेल्या पावलांचं कौतुक केलं. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेला, बँकांना आणि चलनवाढ आटोक्यात आणण्याला फायदा झाल्याचं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्राला बदलत्या काळानुसार सुसंगत करण्यासाठी रिझर्व्ह बँक कार्यरत असल्याचं गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी म्हणाले.

राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

देशातल्या करपद्धतीमध्ये आजपासून सुरू झालेल्या नव्या आर्थिक वर्षात काहीही बदल होत नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या आर्थिक वर्षापासून डिफॉल्ट व्यवस्था नवीन कर रचना लागू झाली असली तरी करदात्यांना जुनी कर रचना निवड करण्याचा पर्याय खुला असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं. व्यक्तीगत करदात्यांसाठी ही नवीन कर रचना आहे. गेल्या आर्थिक वर्षाचा कर विवरणपत्र भरेपर्यंत या कर रचनेतून बाहेर पडण्याचा पर्याय उपलब्ध असेल. व्यावसायिक उत्पन्न नसलेल्या सर्व करदात्यांना दरवर्षी कर विवरणपत्र भरताना ही संधी मिळेल. नव्या कर रचनेत करांचे दर कमी असले तरी विविध सवलती उपलब्ध नाहीत.

**<><><><><>**

आयकर वसुलीप्रकरणी काँग्रेसपक्षाला आज दिलासा मिळाला असून निवडणूकांच्या काळात पक्षाकडून जबरदस्तीने ही वसुली करण्यात येणार नसल्याचे निवेदन आज केंद्र सरकारच्या वतीनं देशाचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात दिलं. लोकसभा निवडणुकीच्या काळात येत्या जुलै महिन्यापर्यंत आयकर विभागाच्या ३ हजार ५०० कोटी रुपयांच्या कर थकबाकीची वसुली केली जाणार नाही असंही न्यायालयाला सादर केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. केंद्र सरकारनं न्यायमुर्ती बीव्ही नागरत्ना आणि न्यायमुर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपिठासमोर हे निवेदन दिलं आहे. काँग्रेस पक्षाच्या आयकर थकबाकीबाबत दिल्ली उच्च न्यायालयानं २०१६ साली दिलेल्या आदेशाला आव्हानं देणाऱ्या याचिकेला काँग्रेसनं २०१८ साली सर्वोच्च न्यायालयात आव्हानं दिलं होतं. या याचिकेच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयात आज केंद्र सरकारनं निवेदन दिलं. या याचिकेची पुढील सुनावणी २४ जुलै रोजी होणार आहे.

<><><><>

दिल्लीतल्या विशेष न्यायालयानं दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सक्तवसुली संचालनालयानं त्यांना कथित मद्य करनिर्धारण धोरण आणि मनीलाँडरिंगप्रकरणी २१ मार्चला अटक केली होती. त्यानंतर कालपर्यंत ते सक्तवसुली संचलनालयाच्या कोठडीत होते.

<><><><>

राज्यात आजपासून नवीन वीज दर लागू झाले आहेत. इंधन अधिभार जोडल्यावर सुमारे १० टक्के दरवाढीचा बोजा महावितरणच्या ग्राहकांवर पडणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्च २०२३ च्या आदेशानुसार ही दरवाढ झाली आहे. दोन वर्षांसाठी दोन टप्प्यांत वीज दरवाढ होईल. घरगुती

संवर्गातील सिंगल फेजसाठी पूर्वी ११६ रुपये लागायचे. आता १२८ रुपये लागतील. थ्री फेजसाठी पूर्वीच्या ३८५ रुपयांऐवजी ४२५ रुपये लागणार आहेत. वाणिज्यिक ग्राहकांना पूर्वीच्या ४७० रुपयांऐवजी ५१७ रुपये द्यावे लागतील.

<><><><><>

राज्यात सलग दुसऱ्या वर्षी रेडी रेकनरच्या दरात वाढ करण्यात आलेली नाही. सरकारच्या या निर्णयाबद्दलचे परिपत्रक काल जारी झाले. यामुळे बांधकाम क्षेत्र आणि ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. दरवर्षी १ एप्रिलपासून रेडी रेकरनचे नवीन दर जाहीर केले जातात. २०२३-२४ या आर्थिक वर्षांत राज्य सरकारला ५० हजार कोटी रुपयांचा महसूल रेडी रेकनरच्या माध्यमातून मिळाला, असं नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक हिरालाल सोनवणे यांनी सांगितलं.

<><><><><>

पश्चिम बंगालच्या जलपायगुडी जिल्ह्याच्या काही भागात आलेल्या चक्रीवादळात चौघांचा मृत्यु झाला असून शंभरहून अधिक लोक जखमी झाले आहेत. या चक्रीवादळामुळे जलपायगुडी शहर आणि मैनागुडी भागातील अनेक घरं कोसळली तर झाडं उन्मळून पडली आहेत. ईशान्य भारतातल्या खराब हवामानामुळं सर्वसामान्य जीवन प्रभावित झालं आहे. आसाममध्ये मुसळधार पावसामुळे गुवाहाटी विमानतळाचं छत कोसळलं तसंच याचा परिणाम विमान वाहतुकीवरही झाला.

<><><><><>

पाकिस्तानातल्या खैबर पख्तूनख्वा भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे विविध ठिकाणी १० जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत तर १२ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये ८ लहान मुलांचा समावेश आहे. शुक्रवारपासून सुरु असलेल्या या पावसाने या भागातली २७ घरांचं नुकसान झालं असून प्रभावित

भागात बचाव पथकं पाठवल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलाशी झालेल्या चकमकीत एक माओवादी ठार झाला. टेतमागडू विभागात कोबरा बटालियन आणि जिल्ह्याच्या राखीव सुरक्षा दलानं ही कारवाई केली. या ठिकाणाहून शस्त्रं आणि काडतूसं जप्त केल्याची माहिती सुकमाच्या पोलिस अधिक्षकांनी दिली.

**<><><><><>**

इस्त्रायल आणि हमास यांच्यात त्वरित युद्धबंदी व्हावी असं आवाहन पोप फ्रान्सिस यांनी काल इस्टर संडेनिमित्त केलेल्या भाषणात केलं आहे. व्हॅटिकनच्या सेंट पिटर्स स्क्वेअर इथं ते हजारों लोकांसमोर ते बोलत होते. त्यांनी युरोप आणि मध्य पूर्वेतील समस्यांविषयीही भाष्य केले. मानवतेच्या दृष्टिकोनातून गाझाला मदत दिली जावी आणि ओलिसांची सुटका केली जावी अशी मागणीही त्यांनी केली.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम आकाशवाणी आजपासून आपल्यासाठी घेऊन येत आहे. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आजच्या भागात आपण नागपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता

येईल. तेव्हा ऐकायला विसरू नका, **आजपासून** संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात च्या दरम्यान ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना राजस्थान रॉयल्सशी होणार आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आज संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. विशाखापट्टणम इथं काल झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं चेन्नई सुपर किंग्जला २० धावांनी तर गुजरात टायटन्सनं सन रायझर्स हैदराबादला ७ गडी राखून पराभूत केलं.

**//<><><><><>//**